महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
५ वा मजला, मुख्य इमारत
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२०२६९१३ Email ID :shrikant.yadav@nic.in

---

क्रमांक : संकिर्ण ११२४/अ.सं.क्र.२०/का-३ दिनांक : ०३.०९.२०२४

**प्रति,**

**प्रबंधक (निरि-१),**
**मा.उच्च न्यायालय,**
**मुंबई**

**विषय:-** विभागीय शुल्क नियामक समितीचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांची नियुक्ती करण्याबाबत.

**माननीय महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, ८ विभागांकरिता विभागीय शुल्क नियामक समितीचे अध्यक्ष म्हणून मा. उच्च न्यायालयाशी विचार-विनिमय करुन सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांची अध्यक्ष म्हणून शिफारस करण्याची विनंती केली आहे.

२. त्यानुषंगाने नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्यांशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ दिनांक ०१ डिसेंबर, २०१४ पासून राज्यात लागू करण्यात आला आहे. सदर अधिनियमातील कलम ७ मध्ये विभागीय शुल्क नियामक समिती घटीत करण्याबाबत तरतूद आहे-

सदर अधिसूचनेमधील कलम ७ (१) प्रत्येक शैक्षणिक विभागासाठी एक विभागीय शुल्क नियामक समिती घटित करील.

(२) विभागीय शुल्क नियामक समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल-

(क) उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करुन शासनाद्वारे --- अध्यक्ष
नामनिर्देशित करावयाचे एक सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश.

(ख) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा --- सदस्य
विभागीय अध्यक्ष-

msc. 9.docx

(ग) सनदी लेखापाल किंवा व्यय व कामे लेखापाल --- सदस्य

(घ) केंद्रीय शालेय शिक्षण मंडळाचा किंवा भारतीय माध्यमिक शिक्षण प्रमाणपत्र मंडळाचा किंवा इतर कोणत्याही मंडळाचा सेवानिवृत्त प्रमुख किंवा कोणत्याही शैक्षणिक संस्थांशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंध नसलेले शासनाचे शिक्षण सहसंचालक या दर्जाहून कमी दर्जा नसलेला सेवानिवृत्त अधिकारी. --- सदस्य

(ड) प्रादेशिक शिक्षण उप संचालक ---- पदसिध्द सदस्य सचिव

३. तसेच दिनांक ०७ जून २०२१ रोजीच्या अधिसूचनेव्दारे मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर व औरंगाबाद या विभागाकरीता विभागीय शुल्क नियामक समित्या घटीत करण्यात आलेल्या आहेत. सदर सर्व समित्यांचा कार्यकाल समाप्त झालेला आहे. त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार नवीन विभागीय शुल्क नियामक समिती घटीत करण्याचे प्रस्तावित असल्याचे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने नमूद केले आहे.

४. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २३५ अनुसार दुय्यम न्यायालयीन कामकाजासंदर्भात सर्व नियंत्रण अधिकार मा. उच्च न्यायालयास आहेत. त्यामुळे, ८ विभागांकरिता विभागीय शुल्क नियामक समितीचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांच्या नावाची शिफारस करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

( श्री.च.यादव )

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

misc. 1.docx